महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२०००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई - मेल : cecomm@mahadiscom.in

**पी-कॉम/शासकीय निवासस्थान/ परिपत्रक/** No 1 3555 **दिनांक :** - 1 JUN 2018

**वाणिज्य परिपत्रक** ३०६

**विषय :-** शासकीय निवासस्थानात राहणा-या अधिकारी / कर्मचारी यांनी निवासस्थान सोडताना महावितरण कंपनीकडून वीज देयकाची थकबाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित कार्यालयाकडे सादर करण्याबाबत.

**संदर्भ :-** शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२००/१८/२३-अ दि.२२ मे, २०१८.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासकीय निवासस्थानात वास्तव्य करणारे अधिकारी / कर्मचारी शासकीय निवासस्थान सोडताना / रिक्त करताना सदनिकेचे वीज देयक भरत नाहीत/प्रलंबित ठेवतात. त्यामुळे त्यांच्यानंतर सदर सदनिकेत वास्तव्य करण्यासाठी येणा-या अधिकारी / कर्मचा-यांना प्रलंबित वीज देयकामुळे विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते.

शासन निर्णय दि.२२ मे,२०१८ नुसार शासकीय निवासस्थानात राहणा-या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी शासकीय निवासस्थान सोडताना महावितरण कंपनीकडून वीज देयकाची थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच त्यामध्ये खालील आदेश प्राप्त झालेले आहेत.

१. शासकीय निवासस्थानात वास्तव्य करणा-या अधिकारी / कर्मचा-यांनी शासकीय निवासस्थान सोडताना / रिक्त करताना संबंधित सदनिकेस वीज पुरवठा करणा-या कंपनीकडून (उदा. महावितरण, रिलायन्स, बेस्ट, टाटा पॉवर इ.) वीज देयकाची थकबाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यालयाकडे सादर करावे.

२. तसेच वीज पुरवठा खंडीत करण्याबाबत वीज कंपनीस कळवावे अशा सूचना देण्यात येत आहेत.

३. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यकारी अभियंता कार्यालयाने शासकीय निवासस्थान रिक्त करणा-या शासकीय अधिकारी / कर्मचा-यांने त्यांच्या ताब्यातील सदनिकेचे वीज देयक थकीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय निवासस्थानाचा ताबा घेण्याबाबतची कार्यवाही करु नये.

४. उपरोक्त नमूद सूचना शासकीय निवासस्थानात वास्तव्य करीत असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनात आणाव्यात.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील निर्देश देण्यात येत आहेत.

१) संबंधित उपविभागाचे लघुदाब वर्गवारीचे बिलींग प्रमुख म्हणून उपविभागीय अधिकारी हे प्राधिकृत अधिकारी असल्याने त्यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार देण्यात येत आहे.

२) शासकीय आदेशातील ही बाब निवासस्थान वितरीत / ताबा घेणा-या कार्यालयास महावितरण कंपनीच्या अधिक्षक अभियंता स्तरावरुन अवगत करण्यात यावे.

३) महावितरण कंपनीकडून वीज बिल थकीत नसल्याबाबतचा नाहरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज हा ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने उपविभागीय कार्यालयात स्विकारण्यात यावा.

४) उपविभागीय अधिका-यांनी ग्राहकास अंतीम वीज देयके संगणकीय प्रणालीतून द्यावेत.

५) ग्राहकाने अंतीम वीज देयकाचा भरणा केल्यानंतरच उपविभागीय अधिकारी हयांनी संबंधित नाहरकत प्रमाणपत्र द्यावे.

६) नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबतचा अर्ज देत असताना वीज पुरवठा खंडीत करण्याचा अर्ज प्राप्त झाल्यास विद्युत पुरवठा खंडीत करुन संगणकीय प्रणालीमध्ये नोंद करण्यात यावी.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

सोबत : शासन परिपत्रक

**प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे.**

**शासकीय निवासस्थानात राहणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निवासस्थान सोडताना संबंधित वीज पुरवठा करणा-या कंपनीकडून वीज देयकाची थकबाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यालयाकडे सादर करण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः- संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२००/१८/२३-अ**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
**दिनांक :- २२ मे, २०१८**

**परिपत्रकः-**

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासकीय निवासस्थानात वास्तव्य करणारे अधिकारी/कर्मचारी शासकीय निवासस्थान सोडताना/रिक्त करताना सदनिकेचे वीज देयक भरत नाहीत/प्रलंबित ठेवतात. त्यामुळे त्यांच्यानंतर सदर सदनिकेत वास्तव्य करण्यासाठी येणा-या अधिकारी/कर्मचा-यांना प्रलंबित वीज देयकामुळे विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते.

२. उदय योजनेबाबत गठीत केलेल्या राज्यस्तरीय संनियंत्रण समितीच्या दि.२७.०३.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत उदय योजने अंतर्गत सुरु असलेल्या विविध विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये शासकीय निवासस्थानात राहणा-या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निवासस्थान सोडताना महावितरण कंपनीकडून वीज देयकाची थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी घेणे बंधनकारक करण्याची सूचना करण्यात आली आहे.

३. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, शासकीय निवासस्थानात वास्तव्य करणा-या अधिकारी/कर्मचा-यांनी शासकीय निवासस्थान सोडतांना/रिक्त करताना संबंधित सदनिकेस वीज पुरवठा करणा-या कंपनीकडून (उदा.महावितरण, रिलायन्स,बेस्ट,टाटा पॉवर इ.) वीज देयकाची थकबाकी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सबंधित कार्यालयाकडे सादर करावे. तसेच वीज पुरवठा खंडीत करण्याबाबत वीज कंपनीस कळवावे अशा सूचना देण्यात येत आहेत.

४. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यकारी अभियंता कार्यालयाने शासकीय निवासस्थान रिक्त करणा-या शासकीय अधिकारी/कर्मचा-याने त्यांच्या ताब्यातील सदनिकेचे वीज देयक थकीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय निवासस्थानाचा ताबा घेण्याबाबतची कार्यवाही करु नये.

५. उपरोक्त परि.३ मध्ये नमूद सूचना शासकीय निवासस्थानात वास्तव्य करीत असलेल्या सर्व अधिकारी/ कर्मचा-यांच्या निदर्शनात आणाव्यात.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०५२२१६१७३३४५०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

Sanjana Pradeep Khopde

Digitally signed by Sanjana Pradeep Khopde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=162267a166279e51cd3f1cc6e10b61ce9868a859260375a1bba3e5f88931d998, cn=Sanjana Pradeep Khopde
Date: 2018.05.22 16:15:18 +05'30'

(श्रीम.सं.प्र.खोपडे)

अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग

**प्रत,**

१. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई
२. प्रबंधक,उच्च न्यायालय,मूळ शाखा,मुंबई
३. प्रबंधक,उच्च न्यायालय,अपील शाखा,मुंबई
४. प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त,मुंबई
५. प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग
७. प्रधान सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई
८. सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन,मुंबई
९. संचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई
१०. मुख्य अभियंता,प्रादेशिक विभाग (सा.बां.),मुंबई,मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई
११. अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई मंडळ,मुंबई
१२. कार्यकारी अभियंता,इलाखा शहर विभाग,मुंबई
१३. कार्यकारी अभियंता,मध्य मुंबई,वरळी,मुंबई
१४. कार्यकारी अभियंता,उत्तर मुंबई विभाग,अंधेरी (पश्चिम),मुंबई
१५. कार्यकारी अभियंता,इमारती बांधकाम विभाग,कामगार हॉस्पिटल आवार,मुलुंड (प.),मुंबई
१६. बृहन्मुंबईतील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
१७. उप सचिव (उर्जा-५),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई
१८. सर्व मंत्रालयीन विभाग
१९. निवड नस्ती/का-२३अ